नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २५/०४/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा इंदोरा येथे दिनांक २३/०४/२०२२ ते दिनांक २४/०४/२०२२ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे— किशोरसिंग ढलसिग सेंगर, वय ५२ वर्ष, रा. इंदोरा हे बाहेर गावी लग्नाला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा दरवाजाचे कुलुप तोडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने स्वयंपाक खोलीमध्ये असलेली लोखंडी कपाटातुन चांदीचे पायपटी कि. ५,९००/—रू. व नगदी २०,०००/—रू. असा एकुण कि. २५,९००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राय मो.नं ९७६४३८२१७९ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— दिनांक २३/०४/२०२२ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी/पीडित वय ३५ वर्ष ही आपल्या घरी हाजर असतांना आरोपी क्र. १. कवेश उर्फ मोन्टी वासुदेवराव ठवढे, वय २५ वर्ष, रा. मजरा पो. स्ट कासारखेडा ता. आर्वी जि. वर्धा, ह. मु. टेंभरी ता.हिंगणा जि.नागपुर याने 'तु लोकांना जेवन देते, तु मला जेवन का देत नाही' याकारणावरुन फिर्यादीचे उजव्या हाताच्या दंडावर चावा घेतला व दिनांक २४/०४/२०२२ रोजी सांयकाळी १८.०० वा. फिर्यादीचे घराचे आत प्रवेश करुन झोपला असता फिर्यादीने आरोपीला म्हटले की 'तु आपले घरी जाउन झोप' असे फिर्यादीने आरोपीला म्हटले असता आरोपी क्र. १. व २. सुरज वासुदेवराव ठवळे, वय २६ वर्ष रा. मजरा पो.स्ट कासारखेडा ता. आर्वी जि. वर्धा, ह. मु. टेंभरी ता.हिंगणा जि.नागपुर यांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरात येवुन फिर्यादीचे तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४, ३२४, ३४ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार तलमले मो.क्र. ९९२३६९९१८५ हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. मौदा** :— फिर्यादी नामे— सौ.वंदना श्रेयश गजभीये रा. पंचायत समिती मागे मौदा व आरोपी नामे— १) पति— श्रेयश गजभिय हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत गुप्ता मंगल कार्यालय जवळ रमाई नागपूर येथे दिनांक १५/०५/२०१८ ते दिनांक २४/०४/२०२१ चे ०५.३० वा. सुमारास आरोपी नामे— १) व २) निलकंठ गजभिये (सासरे) व ३) प्रतिभा गजभिये (सासु) रा.गुप्ता मंगल कार्यालय जवळ रमाई नागपूर यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदर जंगवाड मो.क्र. ८३२९९४८१०१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा एनएच ४४ बोरखेडी टोल नाक्याजवळ येथे दिनांक २४/०४/२०२२ चे १०.०० वा. ते १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रणय रामदासजी खोडके, वय १८ वर्ष, रा.बेला ता.जि.नागपुर व मृतक नामे— अक्षय मोहन जारंडे, वय २४ वर्ष, रा. बेला हे दोघेही मृतकाची मित्राची एमएच— ४९/बीएफ— ०४६४ क्रमांकाच्या मोटारसायकल ने कळमेश्वर येथे लग्नाला जात होते. त्यादरम्यान मृतक मोटारसायकल चालवित असतांना स्विफट डिझायर गाडी क्रं. एमएच— ३४/बीएफ— ०९४२ चा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे गाडीला समोरून धडक दिली. या अपघातात फिर्यादी ला डोक्याला व डोळयाला गंभीर दुखापत झाली व मोटारसायकल चालक याला सुध्दा छातीला डोक्याला गंभीर दुखापत होउन उपचारादरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पालीवाल मो.क्रं ९९२१३१७२८८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :— अंतर्गत २२ कि.मी. अंतरावरील बडेगांव रोड महारकुंड फाटा येथे दिनांक २४/०४/२०२२ चे १६.०० वा. ते १६.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— राहुल बुध्दीराम चौधरी, वय २४ वर्ष, रा. चनकापुर खापरखेडा व त्याचा मित्र/आरोपी नामे— संदीप मोतीराम प्रजापती(मृतक), वय २३ वर्ष रा चनकापुर खापरखेडा हे एमएच—४०/एएस—४७३४ क्रमांकाच्या मोटरसायकलने डबल सीट टेकाडी गावावरून गहु खरेदी करून परत येत असतांना आरोपीने आपले ताब्यातील गाडी वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने गाडी रोडचे खाली उतरून झाडाला धडक दिल्याने मृतकाचे डोक्याला जबर मार लागुन जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मानकर मो.क्र. ९५७९१३५०५९ हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

**१) पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत नॅशनल विटा भंटी चिकना शिवार येथे दिनांक २३/०४/२०२२ चे ०६.०० वा. २४/०४/२०२२ चे ०७.०० वा. दरम्यान **रतिराम लक्ष्मण भोंडे(मृतक) वय ४५ वर्ष, रा. रिसाया ता. आमगाव ह. मु. मौदा** हे मच्छी पकडण्याकरिता गेले असता कन्हान नदीच्या पाण्यात बुडून मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चेतनलाल तुलाराम मोरगेले, वय ५० वर्ष, रा. रिसाया ता. आमगाव जि. गोंदिया ह.मु. मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गौतम मेश्राम मो.क्रं. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत कन्हान नदीच्या पात्रात येथे दिनांक २३/०४/२०२२ चे ०६.३० वा. दरम्यान **जानबा सहादेव डोंगरे वय ५४ वर्ष, रा. मौदा** हे आंधोळ करण्याकरिता कन्हान नदीच्या पात्रात गेले असता त्यांना फिट ची बिमारी असल्याने ते आंघोळ करीत असतांना त्यांना फिट आली असावी त्यामुळे ते पाण्यात बुडुन मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोहित जानबा डोंगरे, वय २४ वर्ष, रा. शिवाजी नगर, मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गौतम मो.क्रं. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. वेलतुर :–** अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील मौजा दिनांक २४/०४/२०२२ चे १४:५४ वा. दरम्यान फिर्यादी पोलीस पाटील हे घरी हजर असता गावातील कांता भिमराव मेश्राम अंदाजे वय ६५ वर्ष यांनी सकाळी ११.३० वा. चा दरम्यान फिर्यादी पोलीस पाटील यांचे घरी जाऊन सांगीतले की, **किसन अंकुश मोजनकार (मृतक) वय ३५ वर्ष रा.चिकना** हा आपल्या घरामध्ये फाशी लागुन मरण पावला आहे. अशी माहिती मिळताच पोलीस पाटील यांनी जाऊन किसन मोजनकार यांचे घरी पाहाणी केली आसता, किसन मोजनकार याने आपल्या राहाते घरी फाशी लागुन तो मृत अवस्थेत आढळुन आला. .

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ यमदवराव कुंमरे मो.नं.७४४८१२३९३७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**